






मूल्यवर्धन





# मूल्ये आणि जीवन कौशल्ये

## निवडक उपक्रम












Medhakshar

# अनुक्रमणिका


**इयत्ता : पहिली**

शांतता संकेत....................................६
आपल्या वर्गाचे नियम...........................७

**इयत्ता : दुसरी**

माझे शरीर, माझे नियम.........................८
माझा परिचय....................................९
माझी प्रगती – भाग १ .........................१०
आदराने वागणे ..................................११

**इयत्ता : तिसरी**

दयाळूपणा.....................................१२
कचऱ्याचे वर्गीकरण............................१३

**इयत्ता : चौथी**

तोडू नका......................................१४
मेरा नाम बिंसा है..............................१५

**शिक्षकांसाठी** ..................................**१६**

**संसाधने**

प्रकल्पाधारित शिक्षण.......................... २१
सहयोगी खेळ...................................२३


व्हिडिओ पाहण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा.

# प्रास्ताविक

या पुस्तिकेत दिलेल्या निवडक मूल्यवर्धन उपक्रमांतून मूल्याधारित क्षमता आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (एन.ई.पी. २०२०) समाविष्ट असलेली शिक्षणाची पुढील प्रमुख उद्‌दिष्टे विकसित होण्यास मदत होईल :

*''तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि करूणा (सहृदयता), सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्ठीत कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती .... आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम, आणि चांगल्याप्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे.''*

या पुस्तिकेत दिलेले उपक्रम साधारण ४० मिनिटांच्या सत्रांमध्ये आयोजित केले जाऊ शकतात. (काही उपक्रमांना एकापेक्षा जास्त सत्र लागू शकतात.) जास्त सत्रे लागतील असे काही प्रकल्पही यात सुचविलेले आहे.

**व्याप्ती**

उपक्रमांमध्ये सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास (SEED) मधील ८ मुख्य क्षमतांचा समावेश आहे. या पुस्तिकेतील उपक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एन.सी.एफ. २०२३) मधील क्षमतांशीही संबंधित आहे. (तक्ता १ आणि २ पहावा.)

उपक्रमांची रचना पुढील पाच विभागांत (थीममध्ये) केली आहे :

१) वर्गाशी संबंधित नियम

२) 'स्व'ची जाणीव आणि नियमन

३) स्वतःप्रति आणि इतरांप्रति जबाबदारी

४) इतरांशी नातेसंबंध

५) सामाजिक जबाबदारी

काही सहयोगी खेळांचा क्यूआर कोड पुस्तिकेच्या शेवटी दिला आहे.

प्रत्येक उपक्रम आणि संबंधित अध्यापन/शिक्षण पद्धती यामध्ये मूल्ये आणि जीवन कौशल्ये यांची गुंफण केली आहे. मुलांचे मूल्यमापन करण्यासाठी उपक्रमाच्या स्वरूपात अगदी छोट्या चाचण्या दिल्या आहेत.

**अध्यापनशास्त्र**

सर्व उपक्रम ज्ञानरचनावादी शिक्षणशास्त्रावर आधारित आहेत. त्यामध्ये मुलांनी स्वतः विचार करून ज्ञान निर्मिती आणि स्व-धारणा विकसित करणे अपेक्षित आहे. तसे करताना त्यांनी पूर्वानुभव, पूर्वज्ञान आणि इतरांशी झालेला संवाद यांचा आधार घेणे अपेक्षित आहे. सर्व उपक्रमांमध्ये सहयोगी शिक्षणाच्या विशिष्ट रचनांचा वापर केलेला आहे.

उपक्रमनिहाय शिक्षकांसाठीच्या सूचनांमध्ये सहयोगी अध्ययन रचना आणि चर्चेसाठी मुक्तोत्तरी प्रश्नांचा समावेश केलेला आहे. उपक्रम मुलांसोबत घेताना शिक्षक योग्य तो बदल करू शकतात. (जसे की, दिलेल्या गाण्यापेक्षा वेगळे गाणे घेऊ शकतात.)

**व्हिडिओ**

उपक्रमांना पूरक असे पुढीलप्रकारचे व्हिडिओ दिलेले आहेत:

- ॲनिमेटेड गोष्टींचे व्हिडिओ- मुलांसाठी
- ॲनिमेटेड गाण्यांचे व्हिडिओ- मुलांसाठी
- ॲनिमेटेड अध्यापन व्हिडिओ- मुलांसाठी
- ॲनिमेटेड अध्यापन व्हिडिओ- शिक्षकांसाठी (अध्यापनशास्त्रीय तत्त्वे आणि पद्धती)

व्हिडिओंचा क्यूआर कोड अनुक्रमणिकेत दिला आहे.

**तक्ता १ : इयत्ता पहिली आणि दुसरीमधील उपक्रमांत समाविष्ट क्षमता**

| *SEED क्षमता (आणि संबंधित मूल्ये) ** | ***राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ मधील क्षमता ***** |
|---|---|
| **स्व–ची जाणीव आणि स्व–चे व्यवस्थापन (स्वातंत्र्य)** | ● कुटुंब आणि समाजातील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखतात<br>● स्वतःच्या वेगवेगळ्या भावना ओळखतात आणि त्यांचे नीट व्यवस्थापन करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात<br>● विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना आखणे, लक्ष केंद्रित करणे आणि योग्य कृती करण्यासाठी कौशल्ये आत्मसात करतात<br>● पुरेशी कार्यरत स्मृती, मानसिक लवचिकता (लक्ष्य टिकवून ठेवण्यासाठी किंवा योग्यरित्या बदलण्यासाठी), आणि आत्मनियंत्रण (आवेगपूर्ण कृती किंवा प्रतिसादांना विरोध करण्यासाठी) विकसित करतात जे त्यांना संरचित वातावरणात शिकण्यास मदत करते |
| **स्वतंत्र विचार (स्वातंत्र्य)** | ● स्वतःची समज आणि अनुभव व्यक्त करतात |
| **जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता (जबाबदारी, न्याय)** | ● पौष्टिक अन्नाची आवड आणि समज दर्शवतात आणि अन्न वाया घालवत नाहीत<br>● स्वतःची आणि स्वच्छतेची काळजी घेतात<br>● वर्ग स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवतात<br>● नेहमीच्या कृती करताना (चालणे, धावणे, सायकल चालवणे) सुरक्षिततेची जाणीव दाखवतात आणि योग्य रीतीने कार्य करतात<br>● असुरक्षित परिस्थिती समजून घेतात आणि मदत मागतात<br>● वर्ग आणि शाळेतील सामाजिक नियम समजून घेतात आणि त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतात |
| **सर्जनशील आणि चिकित्सक विचार (वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वातंत्र्य)** | ● स्पष्ट कथानक आणि पात्रांसह छोटी कथा सांगतात<br>● कलेच्या माध्यमातून विविध कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी नवनवीन कल्पना करून कार्य करतात |
| **सुसंवादी नातेसंबंध (समता, बंधुभाव)** | ● अस्खलितपणे संभाषण करतात आणि अर्थपूर्ण संभाषण करू शकतात<br>● इतर मुलांच्या भिन्न विचार, प्राधान्ये आणि भावनिक गरजा समजून घेतात आणि त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतात<br>● इतर मुले आणि प्रौढांसोबत सहज संवाद साधतात<br>● इतर मुलांसोबत सहकार्याची वागणूक दाखवतात |
| **विविधतेचा आदर (समता, बंधुभाव)** | ● सर्व सजीवांची काळजी घेतात आणि त्यांच्याशी सहवास साधतात |
| **इतरांची काळजी  करूणा, बंधुभाव)** | ● इतरांना (प्राणी, वनस्पती) गरज असेल तेव्हा दयाळूपणा दाखवून मदत करतात |
| **इतरांच्या कल्याणासाठी योगदान (जबाबदारी, बंधुभाव)** | ● शाळेत आणि/किंवा घरी त्यांच्या वयानुसार कामात गुंतलेले असतात |

**तक्ता २: इयत्ता तिसरी ते पाचवीमधील उपक्रमात समाविष्ट क्षमता**

| *SEED क्षमता (आणि संबंधित मूल्ये) ⁕* | **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ मधील क्षमता ⁕⁕** |
|---|---|
| **'स्व'–ची जाणीव आणि 'स्व'–चे व्यवस्थापन *(स्वातंत्र्य)*** | • कुटुंब आणि समुदायातील व्यक्ती म्हणून 'स्व' ची ओळख विकसित करतात<br>• विविध भावना ओळखतात आणि त्यांचे योग्य नियमन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतात<br>• संरचित वातावरणात शिकण्यासाठी मदत करेल असे पुरेसे आत्मनियंत्रण विकसित करतात<br>• विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना आखण्यासाठी, लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि कृतींना निर्देशित करण्यासाठी कौशल्ये विकसित करतात |
| **स्वतंत्र विचार *(स्वातंत्र्य)*** | • समस्या/घटनेचे अनेक दृष्टीकोनातून परीक्षण करतात |
| **जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता *(जबाबदारी, न्याय)*** | • पौष्टिक अन्नाची समज आहे आणि अन्न वाया घालवत नाहीत<br>• स्वतःची आणि स्वच्छतेची मूलभूत काळजी घेतात<br>• असुरक्षित परिस्थिती समजून घेतात आणि मदत मागतात<br>• नियम समजुतीने स्वीकारतात आणि त्यांचे पालन करतात<br>• एखाद्या समस्येवर/घटनेवर नैतिक आणि मौलिक प्रश्न मांडतात |
| **सर्जनशील आणि चिकित्सक विचार *(वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वातंत्र्य)*** | • योग्य माहिती आणि उद्दिष्टांसाठी तक्ता, कथा आणि संवाद तयार करतात |
| **सुसंवादी नातेसंबंध *(समता, बंधुभाव)*** | • वेगवेगळ्या संदर्भात अस्खलित आणि अर्थपूर्ण संवाद साधतात<br>• तोंडी सादरीकरणे करतात<br>• इतरांचे विचार, प्राधान्ये आणि भावनिक गरजांना सकारात्मक प्रतिसाद देतात<br>• इतर मुलांसोबत सहकार्याची वागणूक दाखवतात |
| **विविधतेचा आदर *(समता, बंधुभाव)*** | • त्यांच्या आसपासच्या परिसरातील सांस्कृतिक विविधतेचे निरीक्षण करतात<br>• कुटुंब आणि समुदायातील संबंध (माणूस आणि प्राणी/निसर्ग यांच्यातील) आणि परंपरांचे वर्णन करतात |
| **इतरांची काळजी *(करूणा, बंधुभाव)*** | • इतरांना (प्राणी, वनस्पती) गरज असेल तेव्हा दयाळूपणा दाखवून मदत करतात |
| **इतरांच्या कल्याणासाठी योगदान *(जबाबदारी, बंधुभाव)*** | • नैसर्गिक संसाधनांचे जतन, सुरक्षा आणि विभागणी कशी केली जाऊ शकते हे स्पष्ट करतात<br>• आपल्या सामाजिक आणि नैसर्गिक वातावरणास लाभ देणारे मूलभूत सामाजिक आणि वर्तणूक नियम, मूल्ये आणि स्वभावांबद्दल जाणून घेतात<br>• वेगवेगळ्या परिस्थितीतील लोकांच्या गरजा ओळखतात<br>• विविध प्रकारची असमानता, पूर्वग्रह आणि भेदभाव ओळखतात<br>• इतरांना मदत करण्याच्या दिशेने वयानुसार काम करण्याची इच्छा आणि सहभाग दर्शवतात |

⁕ या क्षमता मूल्यवर्धन आराखड्यामधील आहेत आणि सर्व इयत्तांमध्ये समान रूपात आहेत.

⁕⁕ या क्षमता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ मधील शालेय शिक्षणाच्या पायाभूत, पूर्व तयारी, मध्य या टप्प्यांत विविध क्षेत्रांमध्ये नमूद केल्या आहेत. काही विधाने मूल्यवर्धन उपक्रमांशी सुसंगत होण्याकरिता थोडी बदललेली आहेत.

इयत्ता पहिली

# शांतता संकेत

**चित्र पाहूया**




- या चित्रात शिक्षिका काय करत आहे?
- मुले काय करत आहेत?

# आपल्या वर्गाचे नियम

**गाणे म्हणूया**

सोपे आहेत आपल्या, वर्गाचे नियम
वागा त्याप्रमाणे, लक्षात ठेवा कायम ।।
दंगामस्तीला नाही, वर्गामध्ये थारा
स्वच्छ ठेवायचा, नेहमी वर्ग सारा
मनावर ठेवायला हवा, बघा संयम ।।
रेघा मारून करू नका, भिंती घाण
स्वच्छ सुंदर वर्ग आहे, आपली शान
सोपे आहेत आपल्या, वर्गाचे नियम ।।

**वर्गाचे नियम**

- नम्रपणे वागूया.
- शाळेत वेळेवर पोहोचूया.
- वर्ग स्वच्छ ठेवूया.







इयत्ता दुसरी


# माझे शरीर, माझे नियम

**विचार करूया**

खाली दिलेल्या परिस्थितीत तुम्हाला कसे वाटेल? जर तुम्हाला आनंद होणार असेल तर चौकटीत (✓) अशी खूण करा. तुम्हाला दुःख होणार असेल तर (×) अशी खूण करा.











# माझा परिचय

**लिहूया**



१. तुझे नाव काय आहे?

माझे नाव ____________________ आहे.



२. तुझे वय किती आहे?

माझे वय ________ वर्षे आहे.

३. तुझा वाढदिवस केव्हा असतो?

माझा वाढदिवस ________________ तारखेला असतो.




४. तू कोठे राहतोस/राहतेस?

मी ______________________ येथे राहतो/राहते.

५. तू कोणत्या शाळेत जातोस/जातेस?

मी __________________________ शाळेत जातो/जाते.



६. तू कोणत्या वर्गात शिकतोस/ शिकतेस?

मी ________________ वर्गात शिकतो/शिकते.

७. तुझ्या वर्गशिक्षकांचे नाव काय आहे?

माझ्या वर्गशिक्षकांचे नाव ____________________ आहे.



८. तुझ्या कुटुंबातील व्यक्तींची नावे काय आहेत?

माझ्या कुटुंबातील व्यक्तींची नावे ____________________

______________________________________________

______________________ आहेत.

**घरी करावयाची कृती**

तुमच्या नावाचा अर्थ काय, हेच नाव का निवडले, इतर कोणती नावे विचारात घेतली होती, याबद्दल घरातील मोठ्या व्यक्तींशी बोला.

# माझी प्रगती भाग-9

## विचार करूया

पुढील वाक्ये वाचा आणि तुमच्या शिक्षकांच्या सूचनेनुसार प्रत्येक वाक्यासमोर १ ते ३ फुले काढा.

१. मला माझ्या आवडी-निवडी माहीत आहेत.
२. मी माझ्या कल्पना इतरांना सांगतो/सांगते.
३. मी माझ्या वस्तूंची काळजी घेतो/घेते.
४. शाळेतील सोयीसुविधा मी योग्य पद्धतीने वापरतो/वापरते.
५. मी शाळेचे आणि वर्गाचे नियम पाळतो/पाळते.
६. घरी मी माझी कामे स्वतः करतो/करते.
७. मी इतरांशी आदराने बोलतो/बोलते.
८. मी माझे मित्र आणि घरातील लोकांना मदत करतो/करते.

## शिक्षकांची नोंद

# आदराने वागणे

## विचार करूया

खालीलपैकी कोणत्या चित्रातील वागणे आदराचे वाटते?












## अभिनय करूया

खाली दिलेल्या प्रसंगी जर तुम्ही असाल, तर तुम्हाला जे हवे आहे ते मिळवण्यासाठी तुम्ही काय म्हणाल किंवा कराल? (लक्षात ठेवा, तुमचे वागणे आदराचे असले पाहिजे.)

१. तुम्ही तुमच्या मित्राच्या घरी जात आहात. तुम्ही रस्ता चुकला आहात. तुम्हाला रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तीला मित्राच्या घराकडे जाणारा रस्ता विचारायचा आहे.

२. तुम्ही शाळेत जाणाऱ्या बसच्या रांगेत उभे आहात. तुम्हाला रांगेच्या सुरूवातीच्या ठिकाणी जायचे आहे, जेणेकरून तुम्ही निश्चितपणे बसमध्ये जाऊ शकाल.

३. तुम्ही तुमच्या मित्राच्या घरी खेळत आहात. तुम्हाला खूप भूक लागली आहे. तुम्हाला मित्राच्या आईला काहीतरी खायला मागायचे आहे.

४. तुम्ही मित्रांबरोबर क्रिकेट खेळत आहात. बॉल शेजाऱ्याच्या बागेत जातो. तुम्हाला तो बॉल परत मिळवायचा आहे.

इयत्ता तिसरी

# दयाळूपणा

## गाणे म्हणूया

माणुसकीला नेहमी जागेन
दयाळूपणे सर्वांशी वागेन ।।धृ।।
देणार नाही प्राण्यांना त्रास
काळजी घेऊन त्यांची खास
प्रेम, करूणा मनात रूजवेन ।।१।।
दु:ख दुसऱ्याचे जाणून घेईन
मदतीचा हात नेहमी देईन
हेच खरे कर्तव्य मानेन ।।२।।
दीनदुबळ्यांची करीन सेवा
नसेल कुणाचा मनी हेवा
सर्वांसाठी सुख मागेन ।।३।।







## लिहूया

तुमच्याबरोबर कोणी दयाळूपणे वागल्याच्या प्रसंगावर विचार करा. त्याबद्दल तुमच्या वहीत लिहा.

### घरी करावयाची कृती

तुमच्याबरोबर दयाळूपणे वागणाऱ्या घरातील व्यक्तीला 'धन्यवाद देणारे पत्र' लिहा.

# कचऱ्याचे वर्गीकरण

**लिहूया**

घर, शाळा आणि परिसरात निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या कचऱ्याचा विचार करा. सुका कचरा, ओला कचरा अशाप्रकारे वहीत त्याची यादी करा.



इयत्ता चौथी

# तोडू नका!

## वाचूया आणि चर्चा करूया

एक लाकूडतोड्या जंगलाच्या जवळ असलेल्या एका गावात राहत होता. तो जंगलातली लाकडे तोडायचा. गावातील लोक ती लाकडे घरे बनवायला, बैलगाडी बनवायला आणि इतर लाकडी वस्तू बनवायला वापरायची.

एके दिवशी त्याच्या कुऱ्हाडीचा दांडा तुटतो. लाकडूतोड्या फार अस्वस्थ होतो. आता तो कुऱ्हाडीशिवाय लाकूड कसं तोडणार? आणि गुजराण करायला पैसे कसे मिळवणार?

न राहवून तो झाडांच्या राणीकडे गेला आणि म्हणाला, ''मला एक मजबूत फांदी द्या ना. मला माझ्या कुऱ्हाडीसाठी नवीन दांडा बनवायचा आहे.''

झाडांची राणी म्हणाली, ''मी एका अटीवर तुला फांदी देते. तू फक्त सुकलेल्या झाडाच्या फांद्या तोडायच्या. जिवंत झाडे तू तोडायची नाहीस.''

लाकूडतोड्याने अट मान्य केली आणि त्याला कुऱ्हाडीचा दांडा बनवायला मजबूत फांदी मिळाली.

कुऱ्हाड हातात धरून तो जंगलाच्या दिशेने चालू लागला.

''या मजबूत कुऱ्हाडीने मी आता सगळी झाडे तोडून विकू शकतो आणि भरपूर पैसे मिळवू शकतो.'' तो इतक्या मोठ्याने हे बोलला की, झाडांच्या राणीने



ते ऐकले. ती लाकूडतोड्याला म्हणाली, ''सगळी झाडे तोडून टाकल्यावर काय होईल?''

लाकूडतोड्या विचार करू लागला. त्याला त्याची चूक लक्षात आली. तो झाडांच्या राणीला म्हणाला, ''मला माफ करा. माझी कल्पना फार चुकीची होती.''

➢ लाकूडतोड्याची कल्पना चुकीची होती असे तुम्हालाही वाटते का? तुम्हाला असे का वाटते?

## तयार करूया

तुमच्या जोडीदारासोबत मिळून, 'झाडे वाढविणे आणि झाडांचे रक्षण करणे' यांवर आधारित पोस्टर तयार करा.

# ‘मेरा नाम बींसा हैं...’

## गोष्ट पूर्ण करूया


बींसाचे मन आज जरा अस्वस्थ आहे. आज तिचा या शाळेतील पहिला दिवस आहे. तिचे पालक अलीकडेच बिहारहून गोव्यात रहायला आले आहेत. बींसाला त्यांनी गोव्यातल्या मराठी माध्यामाच्या शाळेत दुसरीमध्ये दाखल केले होते.

बींसाला फक्त हिंदी बोलता येते. ‘मी शाळेत सगळ्यांशी कसं बोलेन आणि त्यांचं बोलणं मला कसं समजेल?’ बींसाला प्रश्न पडतो.

पहिल्या दिवशी ती शाळेच्या पटांगणात प्रवेश करताच तिला घाबरल्यासारखे होते.

एक मुलगा तिला बघतो आणि मोठ्याने ओरडतो, ‘‘अरे, ती बघा एक नवीन मुलगी शाळेत आली!’’ एकदम काही मुले तिच्या भोवती गोळा होतात. अनेक प्रश्नांनी तिला भंडावून सोडतात: ‘‘तुझे नाव काय? तू कुठून आलीस? तू कोणत्या वर्गात बसणार आहेस?’’ बींसा हळू आवाजात सांगते, ‘‘मेरा नाम बींसा है। मैं बिहार से आयी हूँ।’’

सगळी मुले ओरडतात, ‘‘ती हिंदी बोलते. तिला मराठी नाही बोलता येत.’’



➢ तुमच्या गटात चर्चा करा आणि गोष्ट पूर्ण करा. गोष्टीचा शेवट.... ‘दोनच आठवड्यात बींसाला शाळेत छान करमायला लागलं...’ असा करा.

# शिक्षकांसाठी

## शांतता संकेत

१. मुलांना चित्र नीट बघण्यास सांगावे.
२. मुलांना विचारावे :
   - या चित्रात शिक्षिका काय करत आहे?
   - मुले काय करत आहेत?
३. मुलांना सांगावे की, आपण वर्गात शांतता संकेत वापरणार आहोत. तो समजून घेऊया.
४. शांतता संकेताच्या पायऱ्या समजावून सांगाव्या. (शांतता संकेत हा व्हिडिओ बघावा.)
५. शांतता संकेताचा २-३ वेळा सराव करावा.

## आपल्या वर्गाचे नियम

१. मुलांना तुमच्यासोबत गाणे म्हणण्यास सांगावे.
२. मुलांना सांगावे की आज ते वर्गाचे नियम तयार करणार आहेत.
३. मुलांचे गट करावे. गटांना पुढील सूचना सांगाव्यात:
   - प्रत्येक गटाने वर्गासाठी २-३ नियम ठरवायचे आहेत.
   - नियम ठरवताना, वर्गातील आवश्यक त्या सर्व घटकांचा विचार करायचा आहे.
४. प्रत्येक गटाने ठरवलेले नियम इतर सर्वांना सांगायचे आहेत.
५. मुलांनी सांगितलेले नियम फळ्यावर लिहावेत. ('वर्गनियम तयार करणे' हा व्हिडिओ पहावा.)
६. मुलांच्या संमतीने वर्गासाठी ५-७ नियम ठरवावेत.
७. मुलांना विचारावे : जर कोणी नियमांचे पालन करत नसेल, तर आपण काय करावे? परिणामस्वरूप योग्य कृती सुचवाव्या. उदाहरणार्थ, जर एखाद्या मुलाने आठवण करून दिल्यावरही ३ पेक्षा जास्त वेळा वर्गाचे नियम पाळले नाहीत, तर तो/ती त्या दिवशीच्या उपक्रमांत भाग घेऊ शकणार नाही. वर्गनियमांचे परिणामही ठरवावेत. ('वर्गनियमांचे परिणाम' हा व्हिडिओ पहावा.)
८. हे नियम चार्टपेपरवर लिहून वर्गातील मुख्य ठिकाणी लावावेत. लिहिलेले नियम आणि परिणाम मोठ्याने वाचून दाखवावेत.

## माझे शरीर, माझे नियम

१. मुलांच्या जोड्या कराव्यात. मुलांना 'विचार करूया' ही कृती वैयक्तिकरीत्या पूर्ण करण्यास सांगावे.
२. त्यांना त्यांच्या उत्तरांबद्दल जोडीदाराशी चर्चा करण्यास सांगावे.
३. काही जोड्यांना त्यांची उत्तरे सर्व मुलांना स्पष्ट करून सांगण्याची संधी द्यावी. (त्यांना कसे वाटेल याचे वर्णन करण्यास सांगावे.)
४. मुलांना 'चांगला स्पर्श (गुड टच)' आणि 'वाईट स्पर्श (बॅड टच)' यांबद्दल सांगावे. चांगल्या स्पर्शातून काळजी, आपुलकी जाणवते. वाईट स्पर्शामुळे अस्वस्थता, राग किंवा भीती जाणवते. अनोळखी व्यक्ती, तसेच मित्र आणि कुटुंबातील सदस्यांकडूनही वाईट स्पर्श केला जाऊ शकतो.
५. तुमच्या वर्गासाठी योग्य भाषा वापरून शरीराच्या खाजगी भागांच्या 'वाईट स्पर्शा'बद्दल सांगावे. (यासाठी तुम्ही बाहुली वापरू शकता.)
६. मुलांना विचारावे : जेव्हा कोणी तुम्हाला 'बॅड टच' करेल तेव्हा तुम्ही काय कराल?
७. मुलांची उत्तरे फळ्यावर लिहावीत. आवश्यकता असल्यास, मोठ्याने 'नाही' म्हणणे, मदतीसाठी ओरडणे किंवा एखाद्या विश्वासू मोठ्या व्यक्तीशी बोलणे यांसारख्या कृती सुचवाव्यात.

## माझा परिचय

१. सर्व मुलांना तुम्ही स्वतःबद्दलच्या काही गोष्टी सांगाव्यात.
२. मुलांना 'लिहूया' ही कृती वैयक्तिकरीत्या (आपापली) पूर्ण करण्यास सांगावे.
३. मुलांच्या जोड्या कराव्यात.
४. त्यांना सांगावे : तुम्ही स्वतःबद्दल लिहिलेले जोडीदाराला सांगा.
५. एकेक करून मुलांना स्वतःबद्दलची माहिती इतर सर्व मुलांना सांगण्याची संधी द्यावी.
६. मुलांना विचारावे : तुम्हाला वर्गमित्राबद्दलची कोणती नवीन माहिती समजली?
७. मुलांना घरी करावयाच्या कृतीची सूचना सांगावी. पुढील मूल्यवर्धन सत्राच्या सुरुवातीला त्याबद्दल प्रश्न विचारावेत.

## माझी प्रगती–भाग १

१. मुलांना कृती समजावून सांगावी. प्रत्येक वाक्यासाठी वर्तनाशी संबंधित काही उदाहरणे द्यावी आणि त्यासाठी उदाहरणाप्रमाणे किती फुले काढता येतील हे सांगावे.
२. मुलांना प्रत्येक वाक्यासाठी १ ते ३ पैकी पुढीलप्रमाणे फुले काढण्यासाठी सांगावे : जर दिलेल्या विधानाप्रमाणे मूल कधी कधीच वागत असेल तर १ फूल, बऱ्याचदा वागत असेल, तर २ फुले, नेहमी वागत असेल तर ३ फुले. मुलांना ही कृती वैयक्तिकरीत्या पूर्ण करण्यास सांगावे.
३. मुलांना त्यांनी वाक्यापुढे काढलेली फुले (श्रेणी) त्यांच्या जोडीदाराला दाखविण्यास सांगावे.
४. काही मुलांना त्यांनी काही वाक्यांपुढे काढलेली फुले (श्रेणी) वर्गातील इतर मुलांना वाचून दाखवण्यास सांगावे. त्यांनी काढलेल्या फुलांची संख्या योग्य आहे हे सांगण्यासाठी काही उदाहरणे द्यायला सांगावी.
५. सर्व मुलांच्या पुस्तिका गोळा करून घ्याव्यात. आवश्यकता असल्यास मुलांना त्यांच्या श्रेणीबद्दल तुम्हाला वैयक्तिकरीत्या स्पष्ट करून सांगण्याची संधी द्यावी.
६. मुलांना एकेक करून बोलवावे आणि त्यांना त्यांच्या जोडीदाराला आठ निकषांना श्रेणी देण्यास सांगावे. तसेच प्रत्येक मुलाच्या पालकांचीही मते घ्यावीत.
७. वरील श्रेणी आणि तुमचे मुलाबाबतचे निरीक्षण यांच्या आधारे एक टिपणी तयार करावी. (या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिलेल्या क्षमता बघाव्यात. ज्या क्षमतांबाबतचे निरीक्षण तुम्ही केले नाही त्या वगळाव्यात.) टिपणी लिहिताना सकारात्मक भाषा वापरावी. मुलांच्या चांगल्या बाजू आणि सुधारणेची क्षेत्रे यांची नोंद करावी.

## आदराने वागणे

१. मुलांना चारही चित्रे पाहून आदराने वागण्याची उदाहरणे ओळखायला सांगावी.
२. काही मुलांना त्यांची मते सर्व मुलांना सांगण्याची संधी द्यावी.
३. मुलांचे गट करावेत. प्रत्येक गटाला अभिनय करूया या कृती अंतर्गत दिलेले प्रसंग विभागून द्यावे. (तुम्ही एक प्रसंग एकापेक्षा जास्त गटांना देऊ शकता.)
४. गटांना दिलेल्या प्रसंगात ते काय करतील यावर चर्चा करण्यास सांगावे.
५. गटांना सांगावे : तुम्ही काय म्हणाल किंवा कराल, त्याचा अभिनय करायचा आहे. गटातील कोणी कोणती भूमिका करायची ते ठरवा.
६. ज्या गटाला पहिला प्रसंग दिला त्यांना अभिनय करण्यास सांगावे. इतर सर्व मुलांना विचारावे : या प्रसंगातील मुलाने काय केले असेल याबद्दल तुम्हाला आणखी काही वेगळे सांगायचे आहे का?
७. इतर ३ प्रसंगांसाठीही वरील टप्प्यांची पुनरावृत्ती करावी.
८. मुलांना विचारावे : जर आपण इतरांशी आदराने वागलो नाही, तर काय होऊ शकते?

'विकी का रागावला?' हा व्हिडिओ मुलांना दाखवावा आणि त्यावर चर्चा करावी.

## दयाळूपणा

१. मुलांना तुमच्याबरोबर कविता म्हणायला सांगावी.
२. मुलांना दयाळूपणाची काही उदाहरणे देण्यास सांगावे. तुम्हीदेखील काही उदाहरणे देऊ शकता.
३. मुलांच्या जोड्या कराव्यात. त्यांना 'लिहूया' ही कृती वैयक्तिकरीत्या पूर्ण करण्यास सांगावे.
४. मुलांनी केलेले लेखन त्यांच्या जोडीदाराला दाखविण्यास सांगावे.
५. काही मुलांना त्यांनी केलेले लेखन वर्गातील इतर मुलांना दाखविण्यास सांगावे.
६. मुलांना घरी करावयाच्या कृतीची सूचना सांगावी. पुढील मूल्यवर्धन सत्राच्या सुरुवातीला याबद्दल प्रश्न विचारावेत.

'विनी आणि अनोळखी व्यक्ती' हा व्हिडिओ मुलांना दाखवावा आणि त्यावर चर्चा करावी.

## कचऱ्याचे वर्गीकरण

१. मुलांना विचारावे : सुका आणि ओला कचरा यात काय फरक आहे?
२. मुलांच्या जोड्या कराव्यात.
३. मुलांना 'लिहूया' ही कृती वैयक्तिकरीत्या पूर्ण करण्यास सांगावे.
४. मुलांना त्यांनी केलेल्या याद्यांवर जोडीदाराशी चर्चा करण्यास सांगावे.
५. जोड्यांना त्यांच्या यादीची जवळ बसलेल्या जोडीशी तुलना करण्यास सांगावे. दोन जोड्यांना सुक्या कचऱ्याची एक यादी आणि ओल्या कचऱ्याची एक यादी एकत्र बनवण्यास सांगावे.
६. काही जोड्यांना त्यांच्या याद्या वाचण्याची संधी द्यावी. काही वस्तूंचे वर्गीकरण चुकीच्या पद्धतीने केले असल्यास, त्याबद्दल प्रश्न विचारावे.
७. मुलांना यादीत भर घालण्यासाठी अधिकाधिक वस्तू सुचवण्यास प्रोत्साहन द्यावे.
८. मुलांना विचारावे : सुका आणि ओला कचरा वेगळा का करावा?

## तोडू नका!

(टीप : पोस्टर तयार करण्यासाठीचे साहित्य मुलांकडे असेल याची खात्री करावी.)

१. मुलांच्या जोड्या कराव्यात.
२. 'वाचूया आणि चर्चा करूया' ही कृती मुलांना पूर्ण करण्यास सांगावे.
३. काही जोड्यांना त्यांनी काय चर्चा केली, ते वर्गातील इतर मुलांना सांगण्याची संधी द्यावी. इतर मुलांना विचारावे : तुम्हाला यात अजून काही सुचवायचे आहे का?
४. 'तयार करूया' या कृतीसाठी मुलांना चर्चा करण्यास सांगावी. त्यांच्या कल्पनांबाबत त्यांना शेजारच्या जोडीशी चर्चा करण्यास सांगावे.
५. मुलांना पोस्टरसाठीची त्यांची कल्पना निश्चित करण्यास सांगावे; म्हणजे दोन्ही जोडीदार त्यात भर टाकू शकतील.
६. पोस्टर तयार करण्यासाठी वेळ निश्चित करून द्यावा आणि पोस्टर तयार करण्यास सांगावे.
७. प्रत्येक जोडीला त्यांचे पोस्टर वर्गातील इतर सर्व मुलांना दाखविण्याची आणि स्पष्ट करून सांगण्याची संधी द्यावी.
८. मुलांना विचारावे : झाडे वाढविणे आणि झाडे वाचविणे का आवश्यक आहे?

१. मुलांचे गट करावेत.
२. त्यांना बींसाची गोष्ट वाचण्यास सांगावे आणि शेवटी दिलेली कृती करण्यास सांगावे.
३. काही गटांना कृती समजावून सांगण्यास सांगावे. सर्व गटांना कृती नीट समजली आहे याची खात्री करावी. तुम्ही त्यांना काही मुद्‌दे सुचवू शकता, जसे की (अ) बींसाला मोकळेपणा वाटण्यासाठी इतर मुलांनी काय केले असेल? (ब) शिक्षक काय करतील? (क) बींसा मराठी शिकायला कशी सुरुवात करेल? याचा विचार करा.
४. या कृतीसाठी वेळ ठरवून द्यावा आणि मुलांना त्यांची चर्चा सुरू करण्यास सांगावे. गटातील सर्व मुलांना कृतीत सहभागी व्हायचे आहे हेही सांगावे. गटातील एकाला चर्चेतून येणारे महत्त्वाचे मुद्‌दे लिहून ठेवायला सांगावेत.
५. थोड्या वेळानंतर मुले त्यांची गोष्ट कशी सांगणार आहेत, हे ठरविण्यास सांगावे.
६. प्रत्येक गटाला त्यांनी तयार केलेली गोष्ट सांगण्याची संधी द्यावी. मुलांच्या प्रयत्नांची प्रशंसा करावी.
७. मुलांना विचारावे: बींसाला इतर मुलांची भाषा बोलता येत नाही म्हणून मुलांनी जर तिच्याकडे दुर्लक्ष केले असते किंवा तिची टिंगल केली असती, तर बींसाला कसे वाटले असते?

# प्रकल्पाधारित शिक्षण

प्रकल्पांद्वारे शिक्षण किंवा प्रकल्प आधारित शिक्षणाच्या स्वरूपात केलेले नियोजित प्रयत्न मुलांना महत्त्वपूर्ण मूल्ये आणि जीवन कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकतात. प्रकल्प शाळेच्या वेळेत किंवा शाळेच्या वेळेनंतर आणि वर्गात, शाळेच्या परिसरात, शाळेच्या शेजारी किंवा अगदी घरातही, असे वेगवेगळ्या ठिकाणी घेतले जाऊ शकतात.

अध्ययन-अध्यापन शास्त्रीय पद्धत, प्रकल्पाधारित शिक्षणामध्ये आव्हानात्मक प्रश्न सोडविण्यासाठी मुलांनी एकत्र मिळून काम करणे अपेक्षित असते. त्यामुळे प्रकल्पाधारित शिक्षण ही पारंपरिक पद्धत, ज्यात मुलांना प्रकल्प म्हणून 'एखादा तक्ता, नमुना तयार कर' असे सांगणे यापेक्षा वेगळे आहे.

प्रकल्पाधारित अध्ययनांतर्गत, मुलांना एखाद्या महत्त्वाच्या समस्येवर किंवा प्रश्नावर एकत्र काम करावे लागते आणि समाधानकारक निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी बरीच मेहनत करावी लागते आणि वेळ द्यावा लागतो. प्रकल्पातील विषय हे मुलांच्या जीवनाशी किंवा त्यांच्या जवळच्या वातावरणाशी संबंधित असावे. महत्त्वाचे म्हणजे, मुलांना त्यांच्या प्रकल्पाची जबाबदारी घ्यावी लागते. प्रकल्पाची अंमलबजावणी करताना घ्याव्या लागणाऱ्या निर्णयांसाठी त्यांना स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे.

**प्रकल्पांचे प्रकार**

मुले विविध प्रकारचे प्रकल्प घेऊन काम करू शकतात, जसे की,

**सार्वजनिक सेवा प्रकल्प :** सर्वांच्या हितासाठीचे प्रकल्प जसे की, बाग तयार करणे, मुलांच्या गटांनी आळीपाळीने झाडांची काळजी घेणे.

**जनजागृती मोहीम :** वाहतूक नियम, सामुदायिक स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन पद्धती यांसारख्या विविध मुद्द्यांवर जनजागृती मोहीम राबवणे.

**संशोधन प्रकल्प :** सर्वेक्षणाद्वारे, प्रश्नावली वापरून आरोग्य आणि स्वच्छतेच्या मुद्द्यांवर संशोधन करणे; उदाहरणार्थ, आरोग्यासाठीच्या चांगल्या आणि वाईट सवयी.

**प्रात्यक्षिक पद्धत :** पावसाच्या पाण्याची साठवण (रेनवॉटर हार्वेस्टिंग) प्रणालींचे मॉडेल तयार करणे.

**प्रकल्पाचे आयोजन**

प्रकल्पाधारित अध्ययन-अध्यापनात पुढील मुख्य टप्प्यांचा समावेश होतो.

**प्राथमिक टप्प्यात** शिक्षकांना प्रकल्प निश्चित करणे, मुलांसाठी मुख्य कृतीचा आराखडा तयार करणे आणि मुलांचे गट तयार करणे या बाबी कराव्या लागतात. मुले त्यांचे प्रकल्प स्वतःही ठरवू शकतात, किंवा शिक्षक त्यांना निश्चित करून देऊ शकतात. त्यानंतर मुलांनी त्यांच्या प्रकल्पांचे नियोजन करावे आणि प्रकल्प व्यवस्थित पूर्ण होण्याच्या दृष्टीने गटप्रमुख ठरवावा. गटांच्या सहमतीने प्रकल्प सुरू करण्याचा दिनांक आणि प्रकल्प पूर्ण होण्याचा दिनांक ठरवावा. (तक्ता १ बघावा.)

**प्रकल्प सुरु असताना** गटाच्या प्रगतीचा आढावा घेत राहावे पण प्रत्यक्ष मुलांचे प्रश्न सोडवू नयेत. त्या ऐवजी मुलांना स्वतः उत्तर शोधण्यासाठी मार्गदर्शन करावे किंवा त्यांना काही सार्वसामान्य सूचना द्याव्यात. **प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर** गटांना त्याच्या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यास सांगावे. मुले प्रकल्पाचे सादरीकरण तोंडी, चार्ट्सद्वारे करू शकतात. प्रत्येक गटाच्या सादरीकरणानंतर इतर गटांना प्रकल्पाबाबत त्यांचे मत सांगण्याची संधी द्यावी. तुम्हीसुद्धा गटांना प्रश्न विचारू शकता. प्रकल्पाच्या शेवटी प्रत्येक गटाची त्यांच्या कामासाठी प्रशंसा करणे खूप महत्त्वाचे आहे.

शेवटचा टप्पा म्हणजे प्रकल्पावर **चिंतन आणि मूल्यमापन करणे.** गटाचे सादरीकरण झाल्यानंतर मुलांनी त्यांचे अनुभव, त्यांना आलेली आव्हाने आणि त्यांना काय शिकायला मिळाले यावर चर्चा करावी. प्रत्येक गटाला प्रकल्प कार्यवाहीबद्दल नेमका अभिप्राय द्यावा; प्रकल्पाचे मूल्यांकन करण्यासाठी तुम्ही मूल्यमापन तक्ता वापरू शकता. (तक्ता २ बघावा.)

तुम्ही औपचारिक पद्धतीने मूल्यमापन केले असेल, तर मुलांना त्यांना मिळालेले गुण सांगावे. मुलांनी गटात कसे काम केले यावरून मुले सुद्धा स्वतःला गुणदान करू शकतात. (तक्ता ३ बघावा.)

**तक्ता १: प्रकल्प योजनेचा नमूना**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव : | | | | |
| गटातील सदस्यांची नावे : | | | | |
| गटप्रमुख/समन्वयक : | | | | |
| प्रकल्प सुरू करण्याची तारीख/वेळ : | | | | |
| प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख/वेळ : | | | | |
| प्रकल्पातील मुख्य टप्पे : | | | | |
| **क्र.** | **टप्पा** | **जबाबदार व्यक्ती** | **लागणारा अंदाजे वेळ** | **लागणारे साहित्य** |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**तक्ता २ : मूल्यांकन करण्यासाठी शिक्षकांनी वापरण्याचा तक्ता (प्रत्येक गटासाठी स्वतंत्र प्रत वापरावी)**

| क्र. | मूल्यमापनाचे मापदंड | गुण ०–१० |
|---|---|---|
| १ | गटाने समाधानकारकपणे काम पूर्ण केले का? | |
| २ | विद्यार्थ्यांनी गटात मिळून काम केले का? | |
| ३ | काम पूर्ण करण्यासाठी गटाने कल्पकता वापरली का? | |
| ४ | गटाने आलेली आव्हाने सकारात्मकतेने पार पाडली का? | |
| ५ | गटाने केलेल्या सादरीकरणाची गुणवत्ता कशी होती? | |

**तक्ता ३ : विद्यार्थ्यांचे स्वयंमूल्यमापन**

| क्र. | मूल्यमापनाचे मापदंड | गुण ०–१० |
|---|---|---|
| १ | माझे काम मी समाधानकारकरीत्या पूर्ण केले का? | |
| २ | गटात मी सहकार्य भावनेने काम केले का? | |
| ३ | गटाचे काम करताना मी माझ्या कल्पना वापरल्यात का किंवा जास्तीची मेहनत घेतली का? | |

# सहयोगी खेळ

सहयोगी खेळ हे मुलांना सहकार्य, सकारात्मक परस्परावलंबन आणि सहभागी जबाबदारी ही कौशल्ये आणि मूल्ये अंगिकारता यावीत म्हणून तयार केलेले आहेत. हे खेळ स्पर्धात्मक अशा पारंपरिक खेळांपेक्षा वेगळे आहेत.

सहयोगी खेळामध्ये, एक खेळाडू किंवा एक गट जिंकत नाही किंवा हारत नाही. खेळातून मुले कौशल्ये आणि मूल्ये आत्मसात करतात.

या पानावर दिलेल्या क्यूआर कोडचा वापर करून तुम्ही व्हिडिओ बघू शकाल. या व्हिडिओंमधून खेळ खेळताना नेमक्या कोणत्या सूचना द्याव्यात हे लक्षात येईल. यू ट्यूबवर तुम्हाला आणखी सहयोगी खेळ मिळतील.

केव्हा आणि कुठे?

सहयोगी खेळ कोणत्याही वेळी घेता येतात– परिपाठाच्या आधी, शारीरिक शिक्षणाच्या तासाला, मुलांचा मूल्यवर्धनचा तास झाल्यानंतर किंवा जेव्हा मोकळा वेळ असेल तेव्हा.

खेळ वर्गाच्या आत किंवा वर्गाच्या बाहेर पुरेशी मोकळी जागा असल्यास घेता येतात.

थोडा बदल करून किंवा वेगवेगळ्या गटातील मुलांसोबत एकच खेळ पुन्हा पुन्हा खेळला जाऊ शकतो. दिलेल्या खेळांपासून तुम्ही नवीन खेळही तयार करू शकता.












Medhakshar

Muttha Chambers II, Senapati Bapat Road, Pune 411016
www.medhakshar.com